दैनिक प्रहार, १० डिसेंबर २००९.

[अमृतमंथन] (http://amrutmanthan.wordpress.com/)

# मराठी अभिमान गीताची अमराठी गायकांनाही भुरळ

**मुंबई (प्रतिनिधी)** : मुंबईत अहोरात्र मनोरंजनाचा खजिना उधळणाऱ्या एफएम वाहिन्यांवर 'डाऊन मार्केट' म्हणून मराठी गाण्यांना असलेल्या बंदीच्या निषेधार्थ 'मराठी अभिमान गीता'चे अवजड शिवधनुष्य उचलणाऱ्या संगीतकार कौशल इनामदारच्या प्रयत्नांना अमराठी गायकांचाही खंबीर पाठिंबा मिळू लागला आहे. मराठी गाण्यांसाठी नेहमीच पार्श्वगायनाला तयार असलेल्या शंकर महादेवनने अलीकडेच या गाण्यासाठी ध्वनिमुद्रण केले. इतकेच नव्हे, हे गाणे आणि या संकल्पनेच्या तो इतक्या प्रेमात पडला की, त्याने दिग्गज गायक हरीहरन यांना स्वतःहून दूरध्वनी करून या प्रकल्पात सहभागी होण्याची आग्रही विनंती केली. आता शुक्रवार ११ डिसेंबर रोजी हरीहरनही या गाण्याच्या ध्वनिमुद्रणात सहभागी होणार आहेत. यापूर्वी महालक्ष्मी अय्यरनेही या गाण्यासाठी ध्वनिमुद्रण केले आहे.

'डाऊन मार्केट' म्हणून मराठी गाण्यांना नाक मुरडणाऱ्या एफएम वाहिन्यांना मराठीची दखल घ्यावीच लागेल, इतके दिमाखदार आणि भव्यदिव्य गाणे तयार करण्याचा विडा कौशलने उचलला आहे. दिवंगत कवी सुरेश भट यांच्या जाज्वल्य लेखणीतून उतरलेले 'लाभले आम्हास भाग्य बोलतो मराठी' हे गाणे




कौशलने निवडले असून १००हून अधिक दिग्गज गायक-गायिका आणि २००हून अधिक जणांच्या कोरसमधून हे गाणे साकारते आहे. आतापर्यंत ११० मुख्य गायक-गायिकांनी या गाण्याचे ध्वनिमुद्रण केले आहे. मराठीवरील प्रेमापोटी आणि कौशलच्या उपक्रमाचे कौतुक म्हणून मराठी-हिंदीतल्या अनेक नामवंत आणि कसलेल्या गायक-गायिकांनी गाण्याची केवळ एकेक ओळ गायला लगेचच तयारी दाखवली.

या संदर्भात कौशल सांगतो, ''आरती अंकलीकर-टिकेकर यांच्यासारख्या प्रख्यात शास्त्रीय गायिकेपासून अवधूत गुप्ते, सलील कुलकर्णी यांच्यासारख्या आजच्या काळातल्या तरुण गायक-संगीतकारांपर्यंत प्रत्येकाने अगदी आपलेपणाने या गाण्यासाठी वेळ दिला. गेल्या आठवड्यात शंकर महादेवनचे ध्वनिमुद्रण झाले. त्याला हे गाणे आणि संकल्पना दोन्ही खूप आवडले. त्याने हरीहरनकडूनही गाणे गाऊन घेण्याची सूचना केली. मात्र, त्यांच्याशी ओळख नसल्याचे मी सांगताच त्यानेच दुसऱ्या दिवशी फोन करून सांगितले की, हरीहरनला गाण्याविषयी सांगितले असून ते गायला तयार आहेत. शंकरने रेकॉर्डिंगच्या दिवशी माझ्यासमोर केवळ तोंडदेखला हरीहरनला फोन न करता दुसऱ्या दिवशी मी समोर नसताना आठवणीने माझ्यासाठी फोन केला, ही बाब मला खूप महत्त्वाची वाटते.' हिंदीत संगीतकार म्हणून सध्या गाजत असलेल्या स्वानंद किरकिरेनेही आपला आवाज या गाण्याला दिल्याचे कौशलने सांगितले.

या गाण्याइतकाच दिमाखदार व्हीडिओ करण्याचीही कौशलची योजना असून गाणे भव्यदिव्य होण्यासाठी कोणतीही कसूर ठेवायची त्याची तयारी नाही. त्यासाठीच गाण्याच्या वाद्यमेळ्यातील स्ट्रिंग सेक्शन त्याने थेट चेन्नईत ए. आर. रहमानच्या स्टुडिओत जाऊन ध्वनिमुद्रित केले होते.

या प्रकल्पाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे एखादी संस्था किंवा कॉर्पोरेट कंपनीकडून देणगी न घेता थेट लोकांनी केलेल्या आर्थिक सहयोगातूनच हा प्रकल्प पूर्ण करण्याचा कौशलचा निर्धार असून प्रत्येकाने केवळ ५०० रुपयांची देणगी द्यावी, असे त्याचे आवाहन आहे. त्याबदल्यात देणगीदाराला या गाण्याची सीडी आणि संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्याचा सारांश सांगणारी एक पुस्तिका देण्यात येणार आहे. या पुस्तिकेत सर्व देणगीदारांची नावेही असतील.